**मे. आरसीसीपीएल प्रा. लि. दुसरा माळा, इंडस्ट्री हाऊस, १५९, चर्चगेट रिक्लेमेशन, मुंबई यांनी त्यांच्या प्रस्तावित मे. परसोडा चुनखडी खाण, परसोडा, कोथोडा (खु), कोथोडा (बु.), गोविंदपूर, ता. कोरपना, जि. चंद्रपूर येथे ७५६.१४ हे. क्षेत्रात २.९ दशलक्ष टन प्रती वर्ष (चुनखडी (ROM)- २.० दशलक्ष टन प्रती वर्ष, वेस्ट ॲण्ड डोलोमाईट-०.८१५ दशलक्ष टन प्रती वर्ष व टॉपसॉईल-०.०८५ दशलक्ष टन प्रती वर्ष) उत्पादन क्षमतेच्या चुनखडी खाणी प्रकल्प प्रस्तावाबाबत पर्यावरणविषयक जनसुनावणीचे इतिवृत्त**

| | | |
|---|---|---|
| **दिनांक** | **:** | **२२/०९/२०२०** |
| **वेळ** | **:** | **सकाळी ११.१५ वाजता** |
| **स्थळ** | **:** | **नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, चंद्रपूर** |

**<u>प्रस्तावनाः-</u>**

मे. आरसीसीपीएल प्रा. लि. दुसरा माळा, इंडस्ट्री हाऊस, १५९, चर्चगेट रिक्लेमेशन, मुंबई यांनी त्यांच्या प्रस्तावित मे. आरसीसीपीएल प्रा. लि., परसोडा चुनखडी खाण, परसोडा, कोथोडा (खु), कोथोडा (बु.), गोविंदपूर, ता. कोरपना, जि. चंद्रपूर येथे ७५६.१४ हे. क्षेत्रात २.९ दशलक्ष टन प्रती वर्ष (चुनखडी (ROM)- २.० दशलक्ष टन प्रती वर्ष, वेस्ट ॲण्ड डोलोमाईट-०.८१५ दशलक्ष टन प्रती वर्ष व टॉपसॉईल-०.०८५ दशलक्ष टन प्रती वर्ष) उत्पादन क्षमतेच्या चुनखडी खाणी प्रकल्पाबाबतच्या, प्रकल्पधारकाने पर्यावरण मंजूरीकरिता पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना अर्ज सादर केल्यानंतर पर्यावरण मुल्यांकन तज्ञ समिती (EAC) यांनी त्यांच्या दि. १९-२० फेब्रुवारी रोजी सदर प्रस्तावीत प्रकल्पास प्राथमिक पत्र (TOR) जारी केले व पर्यावरण आघात मुल्यांकन अधिनियम २००६ च्या तरतुदीप्रमाणे पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत जाहीर जनसुनावणीमध्ये उपस्थित झालेले मुद्दे व त्याबाबत प्रकल्पधारकाने दिलेली उत्तरे यांचा सामावेश करून नवीन पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले.

प्रकल्प व्यवस्थापनाने पर्यावरण विषयक जनसुनावणीसाठी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे उपरोक्त प्रकल्पाकरीता अर्ज केल्यावर मप्रनि मंडळ, चंद्रपूर व जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या समन्वयाने दि. २४/०४/२०२० ही तारीख निश्चित करण्यात आली होती. पर्यावरण आघात मुल्यांकन अधिनियम २००६ मध्ये नमुद केलेल्या तरतुदी प्रमाणे सदर जनसुनावणीची जाहीर सुचना, मप्रनि मंडळाने दि. १८/०३/२०२० रोजीच्या मराठी दैनिक "लोकसत्ता" व इंग्रजी दैनिक "द हितवाद" मध्ये प्रसिध्द केली. वृत्तपत्रातील जाहीर सुचनेच्या जाहिरातीद्वारे सर्व संबंधित व्यक्तींना त्यांच्या सुचना, टीकाटिप्पणी, विचार, आक्षेप इत्यादी या कार्यालयाकडे नोंदविण्याबाबत आवाहन करण्यात आले होते.

तथापि, मात्र COVID-१९ विषाणुच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे सदरहू जनसुनावणी पुढे ढकलण्यात आली होती व त्याबाबत दि. २२/०४/२०२० रोजीच्या दैनिक वृत्तपत्रात जाहिरात प्रसारित करून संबंधितांना अवगत करण्यात आले होते.

पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे परिपत्रक क्रं. F.No. २२-२५/२०२०-IA.III दि. १४/०९/२०२०, मधील मुद्दा क्रं. ३ (iii) नूसार ऑनलाईन पद्धतीने जनसुनावणी घेण्यात येऊ शकते व त्यासोबतच कोरोना विषाणुच्या प्रादुर्भावाच्या पूर्वी जशी जनसुनावणी सामान्य पद्धतीने घेण्यात येत होती तशी देखील, १०० लोकांइतका जमाव जमा करून, सामाजिक अंतर राखून व संबंधित नियमांचे पालन करून जनसुनावणी घेण्यात येऊ शकते. दि. २०/०९/२०२० रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या शुध्दिपत्रकात विस्तृतपणे खाली उल्लेख कलेल्या ३ बाबींचा टिपमध्ये समावेश करण्यात आलेला होता.

**टिप:-** १) भारत सरकारच्या दि. २९/०८/२०२० रोजीच्या 'अनलॉक-४' च्या नियमावलीनूसार एकावेळेस १०० लोकांची उपस्थिती ठेवून, नागरीकांमध्ये सामाजिक अंतर राखून व संबंधित नियमांचे पालन करून जनसुनावणी घेण्यात येणार आहे. जनसुनावणीच्या दिवशी १०० पेक्षा जास्त नागरीक जमल्यास टप्प्या-टप्प्याने सदर जनसुनावणीची प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल.
२) ज्या ग्रामस्थांना ऑनलाईन प्रणालीचा वापर करता येणार नाही किंवा ज्यांना CISCO WEBEX ॲप द्वारे जनसुनाणीमध्ये सहभाग होऊ शकणार नाही, ते ग्रामस्थ जिल्हाधिकारी कार्यालय, चंदपूर येथे जनसुनावणीकरिता उपस्थित राहू शकतात.
३) ज्या ग्रामस्थांना/सामाजिक संस्था, इतर घटकांना ऑनलाईन प्रणालीचा वापर करता येतो त्यांनी, सदर जनसुनावणी ऑनलाईन पद्धतीने CISCO WEBEX App चा वापर करावा. CISCO WEBEX चे Details खालीलप्रमाणे आहेत:- CISCO WEBEX ID:- १७०३९२०१६५, Password:- Admin@Chandrapur

दि. १८/०३/२०२० रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीनुसार सदर सुनावणी ग्रामपंचायत कार्यालय परसोडा येथे निश्चित केली होती. तथापी, सुनावणी स्थळात बदल करण्यात आला व त्या बाबतचे शुध्दिपत्रक देखील दि. २०/०९/२०२० रोजीच्या मराठी दैनिक "लोकसत्ता" व इंग्रजी दैनिक "द हितवाद" मध्ये प्रसिध्द केले होते. स्थानिक अडचणी, कमी क्षमतेची ईंटरनेटची सेवा (Poor internet connectivity & Speed ) त्या काळात सतत पडणारा पाऊस व पाऊसामुळे निर्माण होणाऱ्या समस्या तसेच ग्रामपंचायत परसोडा येथे म्हणजेच पुर्वीचा नियोजित स्थळी पावसाचे पाणी जमा होणे व चिखल सदृश परिस्थिती निर्माण होणे, त्यामूळे स्थानिकांना पुर्व नियोजित सुनावणी स्थळी पोहोचण्याला येणारे अडथळे, तसेच त्यासोबतच कोरोना विषाणुच्या प्रादुर्भावाच्या, सामाजिक अंतर राखणे शक्य न होणे व संबंधित नियमांचे पालन करून जनसुनावणी पुर्व नियोजित सुनावणी स्थळी घेण्यात येणे शक्य नव्हते. म्हणून सुनावणीचे स्थळ हे नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, चंद्रपूर ठेवण्यात येऊन ऑनलाईन व ऑफलाईन (Online & Offline) पध्दतीने घेण्यात आली.

जनसूनावणीबाबत एकुण ४ जाहीराती दि. १८/०३/२०२०, २२/०४/२०२०, ०१/०९/२०२० व २०/०९/२०२० रोजी मराठी वृत्तपत्र "दैनिक लोकसत्ता" व दैनिक "द हितवाद" या इंग्रजी वृत्तपत्रात प्रसिद्ध केल्या होत्या.

या प्रकल्पाबाबत प्रकल्पाचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांशाची इंग्रजी व मराठी प्रत खालील कार्यालयात नागरीकांच्या अवलोकनाकरीता/ संबंधितांच्या अभ्यासासाठी उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.

१. पर्यावरण विभाग, १५ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
२. सह-संचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पाईंट, २ रा व ४ था माळा, सिनेप्लानेट सिनेमा समोर, सायन सर्कल जवळ (पु) मुंबई - ४०० ०२२
३. प्रादेशिक कार्यालय व उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर.
४. जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर.
५. जिल्हा परिषद, चंद्रपूर.
६. जिल्हा उद्योग केंद्र, चंद्रपूर.
७. उप-विभागीय कार्यालय, राजूरा ता. राजुरा जि. चंद्रपूर.
८. तहसिल कार्यालय, कोरपना, ता. कोरपना, जि. चंद्रपूर.
९. पंचायत समिती कार्यालय कोरपना, ता. कोरपना, जि. चंद्रपूर.
१०. ग्रामपंचायत कार्यालय परसोडा, (परसोडा,रायपूर, कोथोडा(खु.)व गोविंदपूर) ता. कोरपना, जि. चंद्रपूर.
११. ग्रामपंचायत कार्यालय कोथोडा (बु.), कोथोडा (खु.) ता. कोरपना, जि. चंद्रपूर.
१२. ग्रामपंचायत कार्यालय दुर्गडी, (दुर्गडी व शिवापूर) ता. कोरपना, जि. चंद्रपूर.
१३. ग्रामपंचायत कार्यालय पारडी, (मेहंदी व पारडी) ता. कोरपना, जि. चंद्रपूर.
१४. ग्रामपंचायत कार्यालय रुपापेठ,(खडकी व रुपापेठ) ता. कोरपना, जि. चंद्रपूर.
१५. ग्रामपंचायत कार्यालय मंगुल्हिरा, ता. कोरपना, जि. चंद्रपूर.
१६. ग्रामपंचायत कार्यालय मांडवा, (मांडवा व जमुळधारा(कन्हाळगांव) ता. कोरपना, जि. चंद्रपूर.

वरील अनुक्रमांक ४ ते १६ वर नमूद शासनाच्या विभागांनादेखील त्यांनी त्यांच्या स्तरावर या जनसुनावणीबाबत व्यापक प्रसिद्धी देण्याबाबत कळविण्यात आले होते (जनसुनावणी समन्वयक यांचे पत्र क्रं. जा.क्रं.मप्रनि/उप्राकाचं/४७४/२०२० दि. १८/०३/२०२० अन्वये). तसेच जाहीर जनसुनावणी बाबत अधिसूचनेमध्ये नमुद केलेल्या पध्दतीचा अवलंब करुन व्यापक स्वरूपात प्रसिध्दी देण्यात आली जेणेकरुन प्रकल्पामुळे बाधित अथवा संबंधित व्यक्तीना त्यांचे आक्षेप, टिका टिप्पणी, विचार अथवा सुचना संबंधित नियामक प्राधिकरणास नोंदविणे सोईचे होईल. सरते शेवटी जनसुनावणीचे स्थळ नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, चंद्रपूर   या ठिकाणी जनसुनावणी ठेवण्यात आली.

पर्यावरण वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार यांच्या दि. १४/०९/२००६ च्या पर्यावरण आघात मुल्यांकनअधिसूचने नुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर जाहीर जनसुनावणी घेण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत केली होती (कार्यालयीन आदेश क्रं. ई-४६/२०२० दि. ०८/०९/२०२०-सदस्य सचिव यांचे पत्र क्रं. BO/JD(WPC)/PH/B-२००९०८-FTS-०१६७, **सहपत्र-१**)

१) श्री. मनोहर गव्हाड, - **अध्यक्ष,**
अपर जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर

२) श्री अशोक करे, - **सदस्य**
प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर

३) श्री. अजित पाटील, - **समन्वयक**
उप-प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर

सदर प्रकल्पाबाबत प्राप्त झालेल्या तक्रारी, आक्षेप, निवेदन, प्रश्न (एकूण ०४) **सहपत्र-२** प्रमाणे खालीलप्रमाणे आहेत:-

१) श्री. दिपक दिक्षीत, प्रकृती फाउण्डेशन, नागपरम यांचे पत्र दि. २२/०९/२०२० व २८/०९/२०२०.
२) श्री. प्रताप गोस्वामी, जागृत किसान मंच, नागपूर यांचे ईमेलपत्र दि. २२/०९/२०२०.
३) श्री. सुधीर पालीवाल, विदर्भ एन्व्हायर्नमेंटल ॲक्शन गृप, नागपूर यांचे ईमेलपत्र दि. २१/०९/२०२०.
४) श्री. वूटकुरी सुनंदा रेड्डी, पर्यावरणवादी तथा अध्यक्ष, धरिश्री पर्यावरणा परिरक्षणा संस्था, नालगोंडा, तेलंगणा राज्य यांचे ईमेलपत्र दि. १९/०९/२०२०.

जनसुनावणी दरम्यान एकूण उपस्थितांचे हजेरीपट (Online & Offline both attendance sheet) **सहपत्र-३** प्रमाणे सोबत जोडलेले आहे.

**<u>जनसुनावणीचे इतिवृत्तः-</u>**

जनसुनावणीच्या सुरुवातीस श्री. अजित पाटील, उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर यांनी अध्यक्ष व उपस्थित अभ्यगतांचे स्वागत करुन जनसुनावणीच्या कार्यपध्दतीबद्दल माहीती दिली. जनसूनावणीबाबत एकुण ४ जाहीराती दि. १८/०३/२०२०, २२/०४/२०२० व ०१/०९/२०२० रोजी मराठी वृत्तपत्र "दैनिक लोकसत्ता" व दैनिक "द हितवाद" या इंग्रजी वृत्तपत्रात प्रसिद्ध केल्या बाबत समन्वयक यांनी सभेस सांगितले.

दि. १८/०३/२०२० रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीनुसार सदर सुनावणी ग्रामपंचायत कार्यालय परसोडा येथे निश्चित केली होती, तथापि सुनावणी स्थळात बदल करण्यात आला व तसेच त्यासोबतच कोरोना विषाणुच्या प्रादुर्भावाच्या, सामाजिक अंतर राखणे शक्य न होणे व संबंधित नियमांचे पालन करून जनसुनावणी पूर्व नियोजित सुनावणी स्थळी घेण्यात येणे शक्य नव्हते. म्हणून सुनावणीचे स्थळ हे नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, चंद्रपूर ठेवण्यात येऊन ऑनलाईन व ऑफलाईन (Online & Offline) पध्दतीने घेण्यात येत आहे असे समन्वयक यांनी सभेस सांगितले. तसेच पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे परिपत्रक क्रं. F.No. २२-२५/२०२०-IA.III दि. १४/०९/२०२०, मधील मुद्दा क्रं. ३ (iii) नूसार

ऑनलाईन पद्धतीने जनसुनावणी घेण्यात येऊ शकते व त्यासोबतच कोरोना विषाणुच्या प्रादुर्भावाच्या पूर्वी जशी जनसुनावणी सामान्य पद्धतीने घेण्यात येत होती तशी देखील, १०० लोकांइतका जमाव जमा करून, सामाजिक अंतर राखून व संबंधित नियमांचे पालन करून जनसुनावणी घेण्यात येऊ शकते, व त्याबाबत दि. २०/०९/२०२० रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या शुध्दिपत्रकात विस्तृतपणे उल्लेख कलेल्या ३ बाबींचा टिपमध्ये समावेश करण्यात आलेला होता व त्या वृत्तपत्रात प्रसिध्द केलेली टिप वाचुन दाखवली व उपस्थितांना व ऑनलाईन प्रणाली द्वारे भाग घेतलेल्या नागरिकांना अवगत करण्यात आली.

तदनंतर, त्यांनी उपस्थितांना पर्यावरण विषयक, सुचना, विचार, आक्षेप इत्यादी घेऊन पुढे यावे अशी विनंती केली. तसेच त्यांनी हि सुनावणी सर्व संबंधित लोकांसाठी आयोजीत केलेली आहे जेणेकरुन त्यांचे पर्यावरण विषयक प्रश्न/शंकाचे निरसन करण्यात येईल असे सांगितले. तदनंतर पर्यावरण वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार यांच्या दि. १४/०९/२००६ व ०१/१२/२००९ च्या पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचने नुसार जनसुनावनीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी किंवा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी या दर्जाच्या असने बंधनकारक आहे.

तद्नंतर जनसुनावणी समन्वयक यांनी जनसुनावणी समितीचे अध्यक्ष यांना जनसुनावणीची कार्यवाही सुरु करण्याबाबत विनंती केली.

जनसुनावणी समितीचे अध्यक्ष यांनी उपस्थित जनसमुदायास मे. आरसीसीपीएल प्रा. लि. यांच्या प्रस्तावित मे. परसोडा चुनखडी खाण, परसोडा, कोथोडा (खु), कोथोडा (बु.), गोविंदपूर, ता. कोरपना, जि. चंद्रपूर येथे ७५६.१४ हे. क्षेत्रात २.९ दशलक्ष टन प्रती वर्ष (चुनखडी (ROM)- २.० दशलक्ष टन प्रती वर्ष, वेस्ट ॲण्ड डोलोमाईट-०.८१५ दशलक्ष टन प्रती वर्ष व टॉपसॉईल-०.०८५ दशलक्ष टन प्रती वर्ष) उत्पादन क्षमतेच्या चुनखडी खाणी प्रकल्पाच्या प्रस्तावाबाबत आपल्या सुचना, विचार,आक्षेप घेऊन पुढे यावे अथवा त्या लेखी स्वरुपात मांडाव्यात, आपण व्यक्त केलेले मत तसेच सुचना व आक्षेप या अधिसूचनेत नमुद केलेल्या तरतुदीप्रमाणे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना कळविण्यात येतील, सदर सुनावणीचे छायाचित्रीकरण व व्हिडीओ शुटींग म.प्र.नि.मंडळाकडुन कायद्यातील तरतुदी प्रमाणे करण्यात येत आहे, तरी प्रत्येकाने आपले प्रश्न शांतपणे व सनदशिर मार्गाने उपस्थित करावेत व जनसुनावणी शांतपणे पार पाडण्यात सहकार्य करावे असे आवाहन केले.तसेच प्रत्येकाने आपले प्रश्न विचारण्यापुर्वी आपले नाव व पत्ता सांगावा जेणे करुन सुनावणीच्या इतिवृत्तांत बनविते वेळी नमुद करण्यात येतील. त्यानंतर त्यांनी प्रकल्प प्रवर्तकांना प्रस्तावित प्रकल्पाबाबतची माहीती उपस्थितांना देण्यात यावी तसेच त्यांनी प्रकल्पाबाबत उपस्थित केलेल्या प्रश्नांचे शंकानिरसन करावे अशी विनंती केली.

तद्नंतर प्रकल्पधारकाने सदर प्रस्तावित प्रकल्पांबाबत पर्यावरण विषयक केलेला अहवाल मराठी भाषेत सादर केला.सादरीकरणात प्रामुख्याने प्रकल्पाबाबत खालील बाबी स्पष्ट करण्यात आल्या.

- प्रकल्पाबाबतची सविस्तर माहीती
- प्रकल्पाचे क्षेत्रफळ, सिमा, अक्षाश-रेखांश, नकाशा, बुडीत क्षेत्र, लाभ क्षेत्र, वन क्षेत्र, प्रकल्पाचे वैशिष्टय, प्रकल्पाचे महत्व, परिणाम, जमिन वापर, भुकंप स्थिरता
- प्रकल्पाचा उद्देश, सामाजिक स्थिती, रोजगाराची संधी, शेतकऱ्यांचा प्रकल्पामुळे होणारा विकास
- प्रकल्पाचे विश्लेषण, सारांश, निष्कर्ष
- सामाजिक व आर्थिक स्थितीचे विश्लेषन
- हवा,पाणी,जमिन,ध्वनी,विस्थापन इत्यादी बाबतची माहीती.
- नियोजीत प्रकल्पामुळे हवा, पाणी, विस्थापन, जैवविविधता यावर होणारे परिणाम व्यवस्थापन.
- प्रकल्प चालु झाल्यानंतर केले जाणारे पर्यावरण व्यवस्थापन याबाबतची माहीती.
- इतर पर्यावरण व्यवस्थापन विषयीची माहीती.

प्रकल्पधारकाने पर्यावरण विषयीची सविस्तर माहीती दिल्यानंतर सुनावणीचे आयोजक यांनी असे आवाहन केले की, यानंतर आक्षेप/सुचना/प्रश्न व उत्तरे घेतले जातील. आपणांस विनंती की, सदर प्रकल्पाच्या पर्यावरण विषयक प्रश्न विचारावेत व त्यांचे समर्पक उत्तर प्रकल्प धारकाने द्यावे.

**जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीका, टिप्पणी, आक्षेप, सुचना तसेच प्रकल्प धारकाने दिलेली उत्तरे/आश्वासने खालील प्रमाणे आहेत:**

**१) <u>श्री. उत्तम पेचे, माजी सरपंच, परसोडा, जि. चंद्रपूर:-</u>**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सदर प्रकल्पास माझे समर्थन आहे. तथापि काही मुद्दे उपस्थित केले जसे कि ७५६ हे. क्षेत्र भुसंपादन करणे, या क्षेत्रातील ८०% जमीन बागायती (Irrigated) शेती असणे, सदर कंपनी खनिज उत्तखनन करतांना ब्लास्टींग केल्याने पाण्याचे स्त्रोत दुषित करणार इ. तसेच रु.२५ लाख प्रति एकर शेत जमीनीचा शेतकऱ्यांना मोबदला द्यावा व एका सात बारा वर एक नौकरी देण्याची विनंती केली. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, भू-संपादनाची प्रक्रिया योग्य तो माबदला व वाटाघाटी करून पूर्ण करण्यात येईल. ब्लास्टींग करताना सुरक्षिततेचे पालन करण्यात येईल. ब्लास्टींग केल्याने पाण्याचा स्त्रोत दूषित होणार नाही. कंपनीतर्फे जमीनी खरेदी विक्रेता समोर वाटाघाटी करून योग्य मोबदला दिला जाईल. स्थानिक लोकांना गुणवत्तेनूसार रोजगारात प्राधान्य दिले जाईल. सामाजिक कार्याअंतर्गत रोजगार उपलब्धीच्या उपाय योजना आखण्यात येतील. त्याचप्रमाणे अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी देखील उपलब्ध होतील. |

२) **श्री. दिपक दिक्षीत, प्रकृती फाउण्डेशन, चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| | सुनावणीच्या वेळीच मी माझे निवेदन दि. २२/०९/२०२० रोजीच्या पत्रान्वये सादर करत आहे. | |
| १) | चंद्रपूर जिल्हा देशात ४थ्या क्रमांकाचा प्रदूषित जिल्ह्यांच्या यादीत आहे. हा प्रकल्प आल्यामुळे प्रदूषण वाढणारच आहे व त्यासाठी म.प्र.नि. मंडळाने काही कृती आराखडा तयार केलेला आहे काय? | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनाणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आलेली आहे व याबाबत म.प्र.नि. मंडळाच्या मुंबई येथील मुख्यालयामार्फत पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार च्या तज्ञ समितीकडे विचारार्थ पाठविण्यात येईल. |
| २) | सदर उद्योग सुरू करण्याआधी पर्यावरणीय नूकसान भरपाईची रक्कम अगोदरच घेण्यात यावी. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनाणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आलेली आहे व याबाबत म.प्र.नि. मंडळाच्या मुंबई येथील मुख्यालयामार्फत पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार च्या तज्ञ समितीकडे विचारार्थ पाठविण्यात येईल. |
| ३) | म.प्र.नि. मंडळाच्या अधिकाऱ्यांनी/समन्वयकाने आजच्या जनसुनावणीच्या कागदपत्रांची तपासणी केली आहे काय व या नियोजित प्रकल्पामुळे प्रदूषण वाढणार आहे काय याबाबत काही तपासणी केली आहे काय? | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनाणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आलेली आहे. जनसुनावणीच्या कागदपत्रांची तपासणी केली आहे. प्रदूषण उद्भवणार व त्यावर नियंत्रण कसे करणार याबाबत पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये व सादरीकरणादरम्यान करण्यात आलेले आहे. |
| ४) | सदर प्रस्तावित प्रकल्पाकडून पर्यावरणीय नूकसान भरपाई म्हणून बँक हमी घेणे आवश्यक आहे. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनाणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आलेली आहे व याबाबत म.प्र.नि. मंडळाच्या मुंबई येथील मुख्यालयामार्फत पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत |

| | | |
|---|---|---|
| | | सरकार च्या तज्ञ समितीकडे विचारार्थ पाठविण्यात येईल. |
| ५) | या प्रकल्पापासून प्रदूषण न होण्यासाठी पर्यावरणासंबंधी जी काळजी घ्यावयाची आहे त्याबाबतची माहिती विविध संस्था व सामान्य नागरीकांना देणे गरजेचे आहे. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनाणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आलेली आहे. जनसुनावणीच्या कागदपत्रांची तपासणी केली आहे. प्रदूषण उद्भवणार व त्यावर नियंत्रण कसे करणार याबाबत पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये व सादरीकरणादरम्यान करण्यात आलेले आहे. तसेच प्रकल्पाबाबतची सविस्तर माहिती व प्रदूषण नियंत्रण योजनांबाबतची माहिती प्रकल्पाच्या भोवतालच्या ग्रामपंचायत कार्यालयात विविध संस्था व सामान्य नागरीकांच्या अभ्यासासाठी जनुसूनावणीच्या तारखेच्या ३० दिवसांपूर्वी ठेवण्यात आले होते. |
| ६) | चंद्रपूर क्षेत्र CEPI अंतर्गत येत असल्यामुळे सद्यस्थितीत या परिसरात जे उद्योग कार्यरत आहेत त्यांच्यावर पर्यावरणीय नूकसान भरपाई म्हणून कोट्यवधी रूपयांचा दंड आकारण्यात आलेला आहे परंतु शासनाच्या तिजोरीत त्याचा एकही रूपया जमा झालेला नाही याबाबत खुलासा करावा. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनाणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आलेली आहे व याबाबत म.प्र.नि. मंडळाच्या मुंबई येथील मुख्यालयामार्फत पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार च्या तज्ञ समितीकडे विचारार्थ पाठविण्यात येईल. |
| ७) | खाण बंद कृती आराखड्याबाबतची माहिती उपलब्ध केलेली नाही. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, खाण बंद कृती आराखड्याबाबतची माहिती पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात (पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल Report) नमूद आहे. |
| ८) | प्रस्तावित प्रकल्पामुळे प्रदूषण होईल व त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांच्या शेतातील कपाशी, सोयाबीन, गहू, मिरची सारख्या पिकांचे नूकसान होईल याबाबत काही उपाय योजना केली आहे काय? | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सदर बाबतची माहिती पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात (पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल Report) नमूद आहे. |
| ९) | सदरील प्रकल्पापासून वनक्षेत्र ०.८ कि. मी. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, वन |

| | | |
|---|---|---|
| | अंतरावर आहे. मेळघाट अभयारण्य, चपराळा अभयारण्याचा हा मार्ग/कॉरीडोर आहे. तसेच ८.० कि.मी. अंतरावरील कन्हाळगांव रेन्जचे प्रस्तावित चपराळा अभयारण्याला या वर्षी मंजूरी मिळालेली आहे. म्हणून वन विभागाची प्रकल्पधारकाने परवानगी घेणे आवश्यक आहे. जेणेकरून वन्यजीवांचे रक्षण होईल व वन्यजीव Mitigation प्लॅन सादर करणे आवश्यक आहे. | विभागाकडून (PCCF-Wildlife) नकाशा मंजूर करून घेतलेला आहे व सदर प्रकल्पाच्या क्षेत्रात कुठल्याही प्रकारचे वनक्षेत्र नाही. प्रकल्पापासून १०.० कि.मी. परिसरातील वनक्षेत्राचे अंतराबाबतची माहिती पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात (पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल Report) नमूद आहे व ते सादरीकरणादरम्यान (Presentation) देखील सांगण्यात आलेले होते आणि १० कि.मी. क्षेत्रात कोणत्याही प्रकारचे अभयारण्य अस्तित्वात नाही. |
| १०) | प्रस्तावित प्रकल्पामुळे परिसरातील नद्यांचे जल प्रदूषण होण्याची शक्यता आहे व त्याबाबत पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात काही उल्लेख नाही. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, जल प्रदूषण व उपाय योजनाबाबतची माहिती, पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात (पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल Report) नमूद आहे. |
| ११) | वन विभागाच्या पत्र क्रं. सव्हे/जमीन/१५१६ दि. २२/०८/२०१९ तील सूचीनूसार वन्यजीव आणि (Flora & Fauna) नूकसान पोहचण्याची शक्यता आहे व त्याबाबत पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात काही उल्लेख नाही. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, प्रकल्पापासून १०.० कि.मी. परिसरातील वनक्षेत्राचे अंतराबाबतची माहिती व वन्यजीव आणि (Flora & Fauna) नूकसान टाळण्याबाबतची माहिती पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात (पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल Report) नमूद आहे व ते सादरीकरणादरम्यान (Presentation) देखील सांगण्यात आलेले होते. |
| १२) | सदर प्रस्तावित प्रकल्प तेलंगणा राज्याच्या सीमेपासून ०.२५ कि.मी. अंतरावर आहे. म्हणून तेलंगणा आणि महाराष्ट्र असे दोन्ही राज्य मिळून एकत्रितरीत्या पुन्हा जाहीर जनसुनावणी घेण्यात यावी. | सुनावणीदरम्यान ऑनलाईन पद्धतीने तेलंगणा राज्याच्या सीमालगत गावांचे काही नागरीक देखील जनसुनाणीमध्ये उपस्थित होते. त्यांनी त्यांचे मत व्यक्त केले आहे व त्याची नोंद ईतिवृत्तात घेण्यात आलेली आहे. तसेच तेलंगणा राज्यातील पर्यावरण विषयक काम करणाऱ्या एका सामाजिक संस्थेनेदेखील सदर प्रस्तावित प्रकल्पास त्यांचे समर्थन |

| | | |
|---|---|---|
| | | दि. १९/०९/२०२० रोजीच्या ईमेलद्वारे पाठविले आहे, प्रत सोबत जोडली आहे. तसेच या मुद्याची नोंद घेण्यात आलेली आहे व याबाबत म.प्र.नि. मंडळाच्या मुंबई येथील मुख्यालयामार्फत पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार च्या तज्ञ समितीकडे विचारार्थ पाठविण्यात येईल. |

**३) श्री. संजय येरमे (सरपंच) परसोडा, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सदर प्रकल्पास माझे समर्थन आहे. तथापि ग्रामसभेच्या माध्यमातुन आम्ही संमतीपत्र (NOC) देत आहोत त्यातील सर्व अटी कपंनीने पूर्ण करावे आणि जमीनीचा मोबदला द्यावा. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, आम्ही ग्रामपंचायतच्या अटीचे शक्य तो निवारण करुया. |
| २) | नदीच्या काठाला लागलेली जमीन सुकली आहे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, या प्रकल्पामुळे नदीच्या पाण्यात कुठल्याही प्रकारचा दुष परिणाम होणार नाही. |

**४) श्री. सोनल भगत, चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीने रोजगार द्यावा. दोन मुलांचे बायोडाटा दिले होते त्यांना अजुन पर्यंत नौकरी मिळाली नाही. सुशिक्षित बेरोजगाराला नौकरी द्यावी आणि कंपनीचे काम चालवण्यासाठी सरकार द्वारा सरकारी अधिकाऱ्यांची नेमणुक करावी आणि गुणवत्तेनुसार काम द्यावे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, स्थानिक लोकांना गुणवत्ता आणि गरजेनुसार प्राध्यानं दिले जाईल. गुणवत्तेनुसार काम दिले जाईल. |

**५) श्री. उत्तम नानाजी पेचे, परसोडा, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | सदर प्रकल्पाला माझा समर्थन आहे. कपंनीने शेतकऱ्यांच्या जमीनीबाबत आणि त्यांच्या उत्पादनाबाबत योग्य लक्ष द्यावे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, कंपनी या बाबत योग्य ती काळजी घेण्यात येईल. |

६) **श्री. सतीश मुसळे, कोरपना, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सदर प्रकल्पाला माझा समर्थन आहे. शेतकारी जमीनीचा योग्य मोबदला द्यावा. कंपनी आल्यामुळे बेरोजगारीचा प्रश्न मिटणार आहे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, कंपनीतर्फे वाटाघाटी करुन योग्य मोबदला दिला जाईल व स्थानिक नागरीकांना गुणवत्तेनूसार रोजगार दिला जाईल. |

७) **श्री.विवेक आकोजवार, भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सदर प्रकल्पाला माझा समर्थन आहे. आदिवासी लोकांच्या विकासासाठी कंपनीने काम करावे हि विनंती. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, कंपनीच्या सी.एस.आर. अंर्तगत आदिवासी लोंकाच्या विकासासाठी कार्यक्रम हाती धरण्यात येतील ज्या मध्ये रोजगार आणि शिक्षणावर संपुर्ण जोर देण्यात येईल. |

८) **श्री. रोहन गादेवार, मुकुटबन, ता. झरी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | सदर प्रकल्पास माझे समर्थन आहे. मुकुटबनमध्ये कंपनी आल्यामुळे मुकुटबन गावात व्यवसाय वाढला आहे आणि आमचे उत्पन्न वाढले आहे. | प्रकल्प प्रवर्तकांनी धन्यवाद दिला आणि सांगितले की, या प्रकल्पामुळे पण परसोडा विस्तारात पण व्यापारी वर्गाला फायदा होईल. |

९) **श्री. पद्माकर मोहितकर, कोरपना, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | सदर प्रकल्पास माझे समर्थन आहे. सर्व प्रथम स्थानिक लोकांना नोकऱ्या द्या त्यानंतर तालूक्यातील लोकांना नोकऱ्या द्या आणि मग जिल्हा आणि बाहेरच्या लोकांना नोकरीमध्ये प्राध्यान्य द्या. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, स्थानिक लोकांना गुणवत्ता आणि गरजेनुसार प्राध्यानं दिले जाईल. |

## १०) श्री. सुधीर पालीवाल, विदर्भ इन्व्हायर्नमेंटल ॲक्शन गृप, नागपुर:-

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | माझ्या दि. २१/०९/२०२० रोजीच्या ईमेलची प्रत म.प्र.नि. मंडळास मिळालेली आहे काय?<br>आजच्या जनसुनावणी समितीचे अध्यक्ष कोण आहेत? तसेच या प्रकल्पामुळे पर्यावरणावर काय परिणाम होणार आहे? | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, दि. २१/०९/२०२० रोजीच्या ईमेल पत्राची प्रत या कार्यालयास प्राप्त झालेली आहे, प्रत सोबत जोडली आहे. जनसुनावणी समितीचे अध्यक्ष हे अपर जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर हे आहेत.<br>**प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की**, पर्यावरणाबाबत काळजी घेण्यात येणार आहे. व या पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल अहवालात विस्तृत खुलासा केलेला आहे. |

## ११) श्री. सैय्यद आबिद अली, कोरपना, ता.कोरपना, जि. चंद्रपूर:-

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | सदर प्रकल्पास माझे समर्थन आहे. कंपनी आल्यामुळे बेरोजगारी कमी होईल. स्थानिक लोकांना नौकरी द्या. कंपनीने शेतकऱ्यां बरोबर वाटाघाटी करून वे.को.ली.च्या रेट प्रमाणे मोबदला द्यावा. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, स्थानिक लोकांना गुणवत्ता आणि गरजेनुसार प्राध्यानं दिले जाईल. कंपनी या बाबत योग्य ती काळजी घेईल कंपनीतर्फे जमीन वाटाघाटी केल्यानंतरच घेण्यात येईल. |

## १२) श्री. देवन्ना, अध्यक्ष, किसान मोर्चा, बेलागांव, तेलंगांना राज्य:-

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | सदर प्रकल्पास माझे समर्थन आहे. कंपनीने कास्तकाराच्या अडचणी बद्दल लक्ष द्यावे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, कंपनीच्या सी.एस.आर. अंर्तगत कास्तकार लोंकाच्या विकासासाठी कार्यक्रम हाती घेण्यात येतील. |

१३) **श्री. अजय येमूलवार, तेलंगांना राज्य:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | सदर प्रकल्पास माझे समर्थन आहे. तेलंगणा राज्याच्या सीमेवर स्थित गावात देखील विकासाची कामे करण्यात यावे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, ज्या प्रमाणे दुसऱ्या ठिकाणी कामे हाती घेतली आहेत त्याचप्रमाणे कामे कंपनीच्या सी.एस.आर. अंर्तगत तेलंगणा राज्याच्या सीमेवर स्थित गावात विकासाची कामे हाती घेण्यात येतील. |

१४) **श्री. गंभीर ठाकरे, तेलंगणा राज्य:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | सदर प्रकल्पास माझे समर्थन आहे. | प्रकल्प प्रवर्तकांनी धन्यवाद सांगितले. |

१५) **श्री. मंगेश ठाकरे, मुकुटबन, ता.झरी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | सदर प्रकल्पास माझा समर्थन आहे | प्रकल्प प्रवर्तकांनी धन्यवाद सांगितले. |

१६) **श्रीमती. भावना वऱ्हाते, येडशी, ता. झरी, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | सदर प्रकल्पास माझे समर्थन आहे. या प्रकल्पाने महिला बचत गटाला काय फायदा होईल. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, ज्या प्रमाणे दुसऱ्या ठिकाणी कामे हाती घेतली आहेत त्याचप्रमाणे कामे कंपनीच्या सी.एस.आर. अंर्तगत तेलंगणा राज्याच्या सीमेवर स्थित गावात विकासाची कामे हाती घेण्यात येतील. |

१७) **श्री. मजहर अली, चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | सदर प्रकल्पास माझा विरोध आहे. नदी पासून खाणीचे अंतर किती आहे? वाघ जाण्याचा मार्ग आहे का? | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, खाणी पासुन नदीचे अंतर २५० मी. आहे |

| | | |
|---|---|---|
| | प्रकल्पामध्ये कुठले वन आहेत का? आणि कुठलीही वॉटर बॉडी डायवर्ट होणार आहे का? | आणि या खाण प्रकल्पाच्या परिसरात कुठल्याही प्रकारचा वाघ जाण्याचा मार्ग नाही. खाणीच्या क्षेत्रात कुठल्याही प्रकारचे वन येत नाही. खाणीपासुन कुठल्याही प्रकारच्या जलस्त्रोताचा मार्ग बदलण्यात येणार नाही आणि जर जरुरी असल्यास योग्य काळजी घेऊन आणि सरकारी नियमानुसार डायवर्जन करण्यात येईल. वरील संपुर्ण माहिती पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये नमुद केलेली आहे. त्याच प्रमाणे सरकारी आदेशाचे व पर्यावरण मंजूरी देण्यात येईल तेव्हा त्यांच्या बऱ्याचशा अटी व शर्ती असतील व त्यांचे काटेकोरपणे पालन करण्यात येईल. |

**१८) <u>श्री. श्रीनिवास अक्कमवार, परसोडा ता. कोरपना, जि. चंद्रपूर:-</u>**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | सदर प्रकल्पास माझे समर्थन आहे. कंपनीने कास्तकारांसोबत मिटिंग घ्यावी आणि त्यांच्या समस्या समजुन घ्यावा. बाहेरच्या लोकांची यामध्ये मदत घेऊ नये. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, कास्तकारांच्या समस्यांची नोंद घेण्यात येईल व त्याबाबतीत योग्य त्या उपाययोजना देखील करण्यात येतील. |

**१९) <u>श्री. प्रभाकर अत्राम, माजी सरपंच, परसोडा, ता. जि. चंद्रपूर:-</u>**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | सदर प्रकल्पास माझा समर्थन आहे. एक सातबारा बरोबर एक नौकरी द्यावी. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, स्थानिक लोकांना शैक्षणिक अर्हतेनूसार आणि गरजेनुसार रोजगारात प्राधान्य दिले जाईल आणि CSR अंतर्गत कौशल्य विकासाकरिता प्रशिक्षण देऊन रोजगाराच्या संधी उपलब्ध केल्या जातील. |

२०)**श्री. कार्तिक कुंटावार, परसोडा, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | सदर प्रकल्पास माझे समर्थन आहे. कंपनी आल्यामुळे बेरोजगारी कमी होईल. स्थानिक लोकांना नौकरी द्या. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, स्थानिक लोकांना शैक्षणिक अर्हतेनूसार आणि गरजेनुसार रोजगारात प्राधान्य दिले जाईल. तसेच CSR अंतर्गत कौशल्य विकासाकरिता प्रशिक्षण देऊन रोजगाराच्या संधी उपलब्ध केल्या जातील. |

२१) **श्री. प्रताप गोस्वामी, जागृत किसान मंच, नागपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | माझ्या दि. २२/०९/२०२० रोजीच्या ईमेलची प्रत म.प्र.नि. मंडळास मिळालेली आहे काय? सदर प्रकल्पाची लोकसुनावणी प्रकल्पाच्या ठिकाणी का घेतली नाही व ऑनलाईन पद्धतीने का घेतली व सदर प्रकल्पामुळे जल, वायु व जमीन प्रदुषण होईल याबाबत प्रकल्प प्रवर्तकाने खुलासा करावा. तसेच वनविभागाची परवानगी घेतली आहे का, वन्य जिवावर या प्रकल्पामुळे काही परिणाम होणार काय? | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, दि. २२/०९/२०२० रोजीच्या ईमेल पत्राची प्रत या कार्यालयास प्राप्त झालेली आहे, प्रत सोबत जोडली आहे. समन्वयकांनी सभेच्या सुरूवातीस व सभा संपतेवेळी देखील याबाबत योग्य ते खुलासा केलेला आहे. तसेच कोरोना विषाणुच्या प्रादुर्भावाच्या, सामाजिक अंतर राखणे शक्य न होणे व संबंधित नियमांचे पालन करून जनसुनावणी पुर्व नियोजित सुनावणी स्थळी घेण्यात येणे शक्य नव्हते. तसेच इतर करणांचा देखील खुलासा यापुर्वीच केला होता. म्हणून सुनावणीचे स्थळ हे नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, चंद्रपूर ठेवण्यात येऊन ऑनलाईन व ऑफलाईन (Online & Offline) पध्दतीने घेण्यात येत आहे असे समन्वयक यांनी सभेस सांगितले.<br>प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, पर्यावरणाबाबत काळजी घेण्यात येणार |

| | | |
|---|---|---|
| | | आहे व या पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल अहवालात विस्तृत खुलासा केलेला आहे. वन विभागाकडून आवश्यक त्या परवानग्या प्रकल्पधारकाने प्राप्त केलेल्या आहेत व प्रकल्पामुळे पर्यावरणावर कुठल्याही प्रकारचा विपरीत परिणाम होणे अपेक्षित नाही. तसेच सादरीकरणावेळी (Presentation) पर्यावरण नियंत्रण विषयक बाबीचा उल्लेख करण्यात आला होता. |

२२) **श्री. दिनेश खाटे, चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | माझा या प्रकल्पास विरोध आहे. सदर प्रकल्प टिपेश्वर अभयारण्यापासून ५० कि.मी अंतरावर आहे. या प्रकल्पामुळे वन्य जीवांवर काही परिणाम होणार काय? | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, हा प्रकल्पामुळे पर्यावरणावर कुठल्याही प्रकारचा विपरीत परिणाम होणे अपेक्षित नाही. |

२३) **श्री. सुरेश चोपणे, ग्रीन प्लॅनेट सोसायटी, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | इकडच्या वाघांवर काय परिणाम होईल आणि काय वन्यजीव व्यवस्थापन आराखडा बनवला आहे काय? या प्रकल्पामुळे भूजल साठ्यावर काही विपरीत परिणाम होणार आहे काय? | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, वन्य जिवनाची संपुर्ण माहिती पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल अहवालात नमुद केलेली आहे. प्रकल्पापासून १० कि. मी. अंतराल कुठल्याही प्रकारचे शेडयुल -१ प्रजाती दृष्टीकोणात आल्या नाहीत. कंपनीने या बाबतीमध्ये वनविभागाकडुन नकाशा पारित करण्यात आला आहे. आणि जरुर पडल्यास भविष्यात अशा वन्य प्राण्यांसाठी संवर्धन आराखडा तयार करण्यात येईल. तसेच भूजल साठ्यावर कुठल्याही प्रकारचा विपरीत परिणाम होणार नाही याची काळजी घेण्यात येईल. |

२४) **श्री. गजानन पैसटवार,मुकुटबन ता.झरी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | सदर प्रकल्पास माझे समर्थन आहे. मुकुटबन ते वणीचा रस्ता खराब झाला आहे तो रस्ता कंपनी बांधेल का? सरकार हा रस्ता बांधेल का? | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सांगण्यात आलेला रस्ता सरकारी असल्यामुळे कंपनी याबाबतीत काहीही सांगण्यास समर्थ नाही. |

२५) **श्री. बंडु धोत्रे, अध्यक्ष, ईको-प्रो सामाजिक संस्था, चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालाचे अवलोकन केले असता, परिसरातील वाघांवर काय परिणाम होईल आणि काय वन्यजीव व्यवस्थापन आराखडा तयार करण्यात आला आहे का? वन्य जीवांवर व ताडोबा कॉरीडोरवर या प्रकल्पामुळे काही परिणाम होणार काय? | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, प्रकल्पापासून १० कि. मी. अंतराल कुठल्याही प्रकारचे शेडयुल-१ प्रजाती दृष्टीकोणात आल्या नाहीत. कंपनीने या बाबतीमध्ये वनविभागाकडुन नकाशा पारित करण्यात आला आहे. आणि जरुर पडल्यास भविष्यात अशा वन्य प्राण्यांसाठीचा संवर्धन आराखडा तयार करण्यात येईल. |

२६) **श्री. पंकज चव्हान, चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | सदर प्रकल्पास माझे समर्थन आहे. स्थानिक लोकांना नौकरी उपलब्ध कराव्या. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, स्थानिक लोकांना गुणवत्तेनूसार आणि गरजेनुसार प्राध्यान्य दिले जाईल. |

२७) **श्री. नेताजी झाडे, परसोडा, चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | सदर प्रकल्पास माझे समर्थन आहे. स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध करण्यात यावा. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, स्थानिक लोकांना गुणवत्तेनूसार रोजगारात प्राधान्य दिले जाईल. |

## २८) सौ.तेजस्वीनी अवाते, महिला बचत गट, पिपंरळ, जि. यवतमाळ:-

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | सदर प्रकल्पास माझे समर्थन आहे. आमच्या बचत गटातून जी रोपे तयार होतात त्याची विक्री संपुर्णपणे होत नाही याची प्रकल्प प्रवर्तकांनी नोंद घ्यावी. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, हया बचत गटातून तयार करण्यात येणारी रोपे कंपनी योग्य दराने खरेदी करणार. |

## २९)सौ. जयश्री आडे, महिला बचत गट, मुकुटबन, ता. झरी, जि. यवतमाळ:-

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | सदर प्रकल्पास माझे समर्थन आहे. आमच्या बचत गटातून त्या पिशव्या तयार होतात त्याची विक्री संपूर्णपणे होत नाही याची प्रकल्प प्रवर्तकांनी नोंद घ्यावी. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, हया बचत गटातून निर्माण होणाऱ्या पिशव्या विक्रीसाठी मोठ्या शहरात पाठवण्याची उपाययोजना उद्योगाद्वारे करण्यात येईल. |

## ३०) श्री. सतीश मुसळे, कोरपना, ता कोरपना, जि. चंद्रपूर:-

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | सदर प्रकल्पास माझे समर्थन आहे. प्रदूषण नियंत्रणाची काळजीपुर्वक अंमलबजावणी करण्यात यावी. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, प्रदूषण नियंत्रणाच्या अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन करण्यात येईल. |

## ३१) श्री. संतोष बानकर, अडेगांव, जि. यवतमाळ:-

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | सदर प्रकल्पास माझे समर्थन आहे. प्रदूषण नियंत्रणाची काळजीपुर्वक अंमलबजावणी करण्यात यावी. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, प्रदूषण नियंत्रणाच्या अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन करण्यात येईल. |

## ३२) श्री. विजय मुसळे, चंद्रपूर:-

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | सदर प्रकल्पास माझे समर्थन आहे. पर्यावरण व सामाजिक उत्तरदायित्वाअंतर्गत किती निधी आहे ते कळवावे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सरकारी आदेशानूसार पर्यावरण व सामाजिक उत्तरदायित्वाच्या निधीबाबतची माहिती पर्यावरण मंजूरीमध्ये नमूद करण्यात येईल. |

### ३३) श्री. प्रेमकुमार नरोडा, मुकुटबन जि. यवतमाळ:-

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | सदर प्रकल्पास माझे समर्थन आहे. रोजगार उपलब्ध करावा. उद्योगाद्वारे मुकुटबन गावात रूग्णवाहिकेची सुविधा उपलब्ध आहे, दुसरी अतिरिक्त रूग्णवाहिका प्रकल्प प्रवर्तक विकत घेणार का? | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, आवश्यकतेनूसार दुसरी अतिरिक्त रूग्णवाहिका घेण्याचा विचार केला जाईल. |

### ३४) श्री. विवेक पुरेकर, जि. चंद्रपूर:-

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | सदर प्रकल्पास माझे समर्थन आहे. आदिवासी लोकांचा उध्दारासाठी उद्योगाने कामे करावीत. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, पर्यावरण व सामाजिक उत्तरदायित्वाअंतर्गत आदिवासी लोंकाच्या विकासासाठी उपाययोजना करण्यात येतील जेणे करुन आदिवासी लोकांना रोजगार उपलब्ध होईल. |

### ३५) श्री. नंदा उलमुले, परसोडा, जि. चंद्रपूर:-

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | रु. २५ लाख प्रति एकर शेत जमीनीचा शेतकऱ्यांना मोबदला द्यावा व एका सात बारा वर एक नौकरी देण्याची विनंती केली. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, जमीन खरोदीची किंमत ही समोरासमोर वाटाघाटी करुन नक्की करण्यात येईल. रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देताना जमीनधारकांना प्राधान्य देऊन आवश्यकतेनूसार रोजगार उपलब्ध करून दिला येईल. |

### ३६) श्री. जमील शेख (अध्यक्ष व्यापारीमंडळ), मुकुटबन, जि. यवतमाळ:-

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | सदर प्रकल्पास माझे समर्थन आहे. बाहेरचे कामगार आल्यामुळे मुकुटबन परिसरात व्यापार वाढलेला आहे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, मुकुटबन परिसरात व्यापार असाच वाढत राहणार. |

**३७) सौ. जयश्री आडे, महिला बचतगट, शिवनकाम, मुकुटबन, जि. यवतमाळ:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | सदर प्रकल्पास माझे समर्थन आहे. शिवनकाम द्वारा उत्पन्न वाढवण्यासाठी कंपनीने कार्य करावे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, CSR अंतर्गत **महिला बचतगट** विकासासाठी व उत्पन्न वाढवाढीसाठी उपाययोजना करण्यात येतील जेणे करुन महिलांना रोजगार उपलब्ध होईल. |

**३८) श्री. मंगेश बांदुरकर, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | प्रकल्प धारकांना आतापर्यंत प्रकल्पाशी निगडीत भरपूर प्रश्न विचारण्यात आले परंतु त्यांनी एकाही प्रश्नाचे उत्तर दिलेले नाहीत. प्रकल्प धारकांना विनंती आहे की, त्यांनी सर्व प्रश्नांचे समाधानकारक उत्तरे द्यावी. | प्रकल्प समन्वयकांनी सांगितले की, सर्वांची प्रश्न संपल्यावर प्रकल्प प्रवर्तक आणि समन्वयकांकडुन उत्तरे देण्यात येतील. |

**३९) श्री. उत्तमराव झाडे, गणेशपूर, जि. यवतमाळ:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | सदर प्रकल्पास माझे समर्थन आहे. प्रदुषण नियंत्रणाची काळजीपुर्वक अंमलबजावणी करावी. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, आम्ही सांगितल्या प्रमाणे पर्यावरण नियंत्रण उपाय योजनांचे संपूर्णपणे पालन करण्यात येईल. |

**४०) श्री. समीर शेख, कोथोडा, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | सदर प्रकल्पास माझे समर्थन आहे. शासनाचे अधिकाऱ्यांनी आमची समस्या एकुण घ्यावी. मध्यस्थी इसम कवडीमोलाने जमीनी विकत घेत आहेत. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, अजुन पर्यंत कंपनीने जमीन खरेदीची प्रक्रिया सुरू केलेली नाही. |

पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समितीचे अध्यक्ष यांनी उपस्थित असलेल्या नागरीकांना आणखी काही प्रश्न/आक्षेप/सूचना असतील तर विचारण्याचे आव्हान केले. मात्र कोणीही तद्नंतर प्रश्न/सूचना/आक्षेप उपस्थित केले नाहीत. त्यानंतर सदस्य पर्यावरण जाहीर

जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, बैठकीत करण्यात आलेल्या सूचना, आक्षेपांची नोंद घेण्यात आली असून त्याचे ईतिवृत्त व रेकॉर्डींग जनतेकरिता प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, पहिला माळा, उद्योग भवन, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर येथे थोड्या दिवसात उपलब्ध करून देण्यात येईल.

अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी बैठकीचा समारोप करताना जनसुनावणीतील उपस्थित झालेल्याबाबींचा आढावा घेऊन उपस्थितांचे आभार मानून जाहीर जनसुनावणी संपल्याचे जाहीर केले.

| | | |
|---|---|---|
| **(अजित पाटील)** | **(अशोक करे)** | **(मनोहर गव्हाड)** |
| समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर | सदस्य, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती तथा प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर | अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती तथा अपर जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर |